मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पदपथ अतिक्रमणाविरोधात महापालिकेची आक्रमक भूमिका

## दुकानांसमोरील अतिक्रमण 15 दिवसात हटवा, अन्यथा कारवाई; आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचा इशारा



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पदपथावरील अतिक्रमण काढण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. पदपथ हे नागरिकांना चालण्यासाठी असतात, त्यामुळे कोणत्याही पदपथावर अतिक्रमण करणाऱ्यांविरूद्ध महापालिकेच्या वतीने कठोर कारवाई केली जाईल. तसेच काही दुकानदार आपल्या दुकानापुढे अतिक्रमण करून साहित्य ठेवतात. त्यामुळे रहदारीला अडथळा निर्माण होऊन नागरिकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत असल्याने अशा दुकानधारकांनी येत्या १५ दिवसांत असे अतिक्रमण कायमस्वरूपी हटवावे अन्यथा महापालिकेच्या वतीने कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिला.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी क्षेत्रीय कार्यालयनिहाय अतिक्रमण कारवाईच्या कामकाजाचा आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे, सहशहर अभियंता बापूसाहेब गायकवाड, प्रेरणा सिनकर, मनोज सेठिया, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे, उप आयुक्त सचिन पवार, डॉ. प्रदीप ठेंगल, राजेश आगळे, व्यंकटेश दुर्वास, कार्यकारी अभियंता महेश बरीदे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, मुख्य उद्यान अधिक्षक महेश गारगोटे यांच्यासह क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे, राजाराम सरगर, अश्विनी गायकवाड, परशुराम वाघमोडे, अतुल पाटील, पुजा दुधनाळे, मुकेश कोळप आदी उपस्थित होते.

महापालिकेने सर्व क्षेत्रीय कार्यालयांअंतर्गत अतिक्रमणमुक्त पदपथ मोहीम हाती घेतली आहे. नागरिकांना चालण्यासाठी विनाअडथळा पदपथ असावेत याकडे महापालिकेने लक्ष केंद्रित केले असून शहरातील पदपथ अतिक्रमणमुक्त केले जात आहेत. ही मोहीम राबविताना पुन्हा त्याच जागी अतिक्रमण होणार नाही याची दक्षता सर्व संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घेणे गरजेचे आहे. सर्व क्षेत्रीय कार्यालयनिहाय हॉकर्ससाठी जागा निश्चित करून त्याठिकाणी हॉकर्स झोन तयार करावा. शहरात बकालपणा वाढणार नाही, तसेच हॉकर्समुळे रहदारीला अडथळा निर्माण होणार नाही यासाठी सर्व क्षेत्रीय कार्यालयनिहाय फिरते पथक नेमून त्यावर सातत्याने देखरेख ठेवावी, असे निर्देश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले.

काही दुकानदार जाणीवपुर्वक दुकानासमोरचे क्षेत्र वाढवून अनधिकृतपणे अतिक्रमण करतात. शिवाय दुकानासमोर साहित्य देखील ठेवतात, त्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होतो. अशा दुकानदारांनी येत्या १५ दिवसांमध्ये दुकानासमोरील अनधिकृत अतिक्रमण आणि साहित्य हटवावे अन्यथा संबंधित दुकानाचे अतिक्रमण निष्कासित करून दुकानदारावर कारवाई करण्यात येईल, असा इशारा देखील आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिला.

# पवना धरणातील पाणीसाठा 25 टक्क्यांवर; पिंपरी-चिंचवडवर पाणीटंचाईचे सावट

## मान्सून लांबल्यास पाणीटंचाईचे गंभीर संकट; नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन



**पिंपरी | प्रतिनिधी**

वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे मावळ तालुक्यातील पवना धरणातील पाणीसाठा झपाट्याने कमी होत असून, सध्या धरणात केवळ २५ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवड शहराच्या पाणीपुरवठ्याबाबत प्रशासनाची चिंता वाढली आहे. प्रशासनाच्या अंदाजानुसार उपलब्ध पाणीसाठा जूनअखेरपर्यंत पुरू शकतो. मात्र, यंदा मान्सून उशिरा दाखल झाला किंवा पावसाचे प्रमाण कमी राहिले, तर शहरावर गंभीर पाणीटंचाईचे संकट निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून दररोज रावेत बंधाऱ्यातून सुमारे ५५० एमएलडी पाणी उचलण्यात येते. हे पाणी निगडी येथील जलशुद्धीकरण केंद्रात प्रक्रिया करून शहरातील विविध भागांना पुरवठा केले जाते. शहराच्या वाढत्या लोकसंख्येमुळे आणि वाढलेल्या नागरी विस्तारामुळे पाण्याची मागणी सातत्याने वाढत आहे. अशा परिस्थितीत धरणातील घटता साठा प्रशासनासाठी मोठे आव्हान ठरत आहे.

दरम्यान, पवना नदीपात्र अनेक ठिकाणी कोरडे पडू लागल्याचे चित्र समोर येत आहे. काही भागांमध्ये नदीपात्रातील पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणावर घटली असून, परिसरातील नागरिकांमध्येही चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. उन्हाच्या वाढत्या झळांमुळे बाष्पीभवनाचे प्रमाण वाढले असून, त्यामुळे उपलब्ध पाणीसाठा अधिक वेगाने कमी होत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

महापालिका प्रशासनाने नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले आहे. वाहन धुणे, बागांना अतिरिक्त पाणी देणे, नळ सुरू ठेवणे किंवा विनाकारण पाण्याचा वापर करणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पाणी वाचवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने वागण्याची गरज असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. तसेच काही भागांत पाण्याच्या वापराबाबत विशेष देखरेख ठेवण्यासही सुरुवात करण्यात आली आहे.मान्सून वेळेत दाखल झाला आणि समाधानकारक पाऊस झाला तर परिस्थिती नियंत्रणात राहू शकते. मात्र, पाऊस लांबल्यास किंवा अपेक्षेपेक्षा कमी झाल्यास शहरात पाणीपुरवठ्यावर निर्बंध लागू करण्याची वेळ येऊ शकते,

# तळेगाव दाभाडे येथे गॅस पाईपलाईन कामामुळे खोदकाम

## पाण्याच्या पाईपलाईन फुटल्याने पुरवठा विस्कळीत; नियोजनशून्य विकासावर नागरिकांचा विरोध

**पिंपरी | प्रतिनिधी**

सुमारे दोन वर्षांपूर्वी प्रशासकीय काळात मंजूर झालेले गॅस पाईपलाईनचे काम सध्या लिंब फाटा ते जिजामाता चौक येथे सुरू आहे. या कामाला दबक्या आवाजात विरोध होत असला तरी एम.एन.जी.एल. या गव्हर्नमेंट कंपनीतर्फे युद्ध पातळीवर हे काम सुरू आहे

प्राप्त माहितीनुसार, दोन वर्षांपूर्वीच या कामाला नगरपालिका प्रशासनाकडून मंजुरी मिळाली होती. त्यानुसार जिजामाता चौक ते खांडगे पेट्रोल पंप हे काम पहिल्या टप्प्यात पूर्ण झाले असून, लिंब फाटा ते जिजामाता चौक हे काम सुरू आहे. काही दिवसांपूर्वीच या रस्त्यालगत पाण्याच्या पाईपलाईनचे काम करण्यात आले होते.

त्यावेळी मोठ्या प्रमाणात खोदकाम झाले होते व आता गॅस पाईपलाईनसाठी पुन्हा त्याच ठिकाणी खोदकाम करण्यात येत आहे. या खोदकामामुळे पाण्याच्या पाईपलाईन फुटून मस्करनेस कॉलनी एक येथे चार ते पाच दिवस तसेच राव कॉलनी, तुकारामनगर येथे प्रत्येकी एक दिवस पाणीपुरवठा विस्कळीत झाला होता. स्थानिक नगरसेवक सागर बोडके यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित राहून पाण्याच्या पाईपलाईनचे काम करून पाणीपुरवठा सुरळीत केला.

अत्यंत वर्दळीच्या या रस्त्यावर खोदकामामुळे वाहतूक कोंडी होत आहे. तसेच गॅस पाईपलाईनचे काम संपूर्ण तळेगाव दाभाडे शहरात होणार असल्याने नागरिकांमध्ये चिंता वाढली आहे. गेली अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्त्याची कामे अलीकडच्या काळात पूर्ण झाली आहेत व गॅस पाईपलाईनसाठी पुन्हा रस्ता खोदावा लागणार असल्याने स्थानिक नागरिकांचा या कामास विरोध होत आहे. तसेच विकास व्हावा ही आमचीही इच्छा आहे. विकासकामांना आमचा विरोध नाही. परंतु विकासकामे करत असताना क्रम लक्षात घेणे गरजेचे आहे.



### नियोजनशून्य विकासाला नागरिकांचा विरोध

**» अत्यंत वर्दळीच्या या रस्त्यावर खोदकामामुळे वाहतूक कोंडी होत आहे. तसेच गॅस पाईपलाईनचे काम संपूर्ण तळेगाव दाभाडे शहरात होणार असल्याने नागरिकांमध्ये चिंता वाढली आहे. गेली अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्त्याची कामे अलीकडच्या काळात पूर्ण झाली आहेत व गॅस पाईपलाईनसाठी पुन्हा रस्ता खोदावा लागणार असल्याने स्थानिक नागरिकांचा या कामास विरोध होत आहे. तसेच विकास व्हावा ही आमचीही इच्छा आहे. विकासकामांना आमचा विरोध नाही. परंतु विकासकामे करत असताना क्रम लक्षात घेणे गरजेचे आहे. वारंवार पाठपुरावा करून तयार झालेले रस्ते वर्षाच्या आत गॅस पाईपलाईन, पाणी पाईपलाईन तसेच ड्रेनेजलाईन याकरिता खोदले जातात यामध्ये आमच्यासारख्या करदात्यांचा पैसा वापरला जातो. त्यामुळे असा विकास आम्हाला नकोय. शहराचा विकास करताना लाईट, पाणी, रस्ते, ड्रेनेजलाईन याचे योग्य नियोजन व्हावे, अशी अपेक्षा नागरिकांनी बोलून दाखवली.**

> **“ दोन वर्षांपूर्वी मंजूर झालेले काम सध्या तळेगाव दाभाडे शहरात सुरू आहे. या कामादरम्यान पाण्याच्या लाईन किंवा रस्त्याचे होणारे नुकसान हे संबंधित गॅस पाईपलाईनचे काम करणाऱ्या कंपनीमार्फत भरून दिले जात आहे. पावसाळ्यापूर्वी लिंब फाटा ते जिजामाता चौक हे काम पूर्ण होईल. उर्वरित कामासाठी पावसाळा संपेपर्यंत थांबावे लागणार आहे. तसेच ज्या भागातील रस्त्यांची कामे पूर्ण झाली आहेत अशा भागात खोदकामाला परवानगी दिली जाणार नाही. आगामी काळात लिंब फाटा ते स्टेशन चौक व मंत्रा सिटी रस्त्याच्या संदर्भात कॉमन डिझाईन पास करून त्याद्वारे काम केले जाईल .**
> **- गिरीश दापकेकर, मुख्याधिकारी, तळेगाव**

# महापालिकेच्या स्वागतम ई-प्रवेश प्रणालीला नागरिकांचा प्रतिसाद

## 1 मे 2026 ते 25 मे 2026 या कालावधीत सुमारे 7 हजार 894 नागरिकांनी या प्रणालीचा लाभ घेतला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि वेळेची बचत करणारी सेवा देण्यासाठी दि. १ मे २०२६ पासून महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीत प्रवेशासाठी 'स्वागतम ई-प्रवेश' ही ऑनलाइन नोंदणी प्रणाली सुरू केली आहे. या प्रणालीला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून १ मे २०२६ ते २५ मे २०२६ (सायंकाळी ४ वाजेपर्यंत) या कालावधीत सुमारे ७ हजार ८९४ नागरिकांनी या प्रणालीचा लाभ घेतला आहे.

स्वागतम ई-प्रवेश प्रणालीअंतर्गत नागरिकांना महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळ WWW.PCMCINDIA.GOV.IN वर जाऊन 'मुख्य इमारत प्रवेश प्रणाली' या लिंकद्वारे आपली नोंदणी करणे सहज शक्य होत आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे नागरिकांना कमीत कमी वेळेत, सुरक्षित आणि सुलभ पद्धतीने महापालिका मुख्य प्रशासकीय इमारतीत प्रवेश मिळवून देणे तसेच प्रत्येक प्रवेशाची अचूक नोंद महापालिकेकडे ठेवणे हा आहे. ऑनलाइन नोंदणीसाठी आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक आणि पासपोर्ट आकाराचा फोटो आवश्यक असून नागरिकांनी या नव्या डिजिटल सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

**अशी करा नोंदणी..**

प्रथमच नोंदणी करणाऱ्या नागरिकांनी आपले लॉगिन अकाऊंट तयार करणे आवश्यक असून त्यामध्ये पूर्ण नाव, राहण्याचा पत्ता, पासपोर्ट आकाराचा फोटो, मोबाईल क्रमांक आणि आधार क्रमांक यांची माहिती नोंदवावी लागेल.

लॉगिन अकाऊंट तयार करण्याची प्रक्रिया केवळ एकदाच करावी लागेल. त्यानंतर नागरिकांना प्रत्येक वेळी थेट लॉगिन करून प्रवेशासाठी नोंदणी करता येणार आहे.

नोंदणीदरम्यान नागरिकांच्या मोबाईल क्रमांकाची ओटीपीद्वारे पडताळणी केली जाणार असून प्रत्येक प्रवेशाच्या वेळीही ओटीपी प्रणाली लागू करण्यात आलेली आहे.

प्रवेश नोंदणी करताना नागरिकांनी किमान १ आणि कमाल ३ विभागांना भेट देण्याची माहिती नमूद करणे आवश्यक आहे.

नागरिकांना नोंदणी करताना ते ज्या दिवशी नोंदणी करीत आहेत, त्या दिवसापासून पुढील ७ दिवसांपर्यंत (शनिवार, रविवार आणि शासकीय सुट्ट्या वगळता) उपलब्ध तारखा दिसतील. त्यानुसार इच्छित दिनांक व संबंधित विभाग निवडून नोंदणी करता येईल.

नोंदणी पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना त्यांच्या मोबाईलवर क्युआर कोड डाउनलोड करता येईल. हा क्युआर कोड महापालिका मुख्य इमारतीच्या प्रवेशद्वारावर दाखविल्यानंतर तो स्कॅन करून प्रवेश सुनिश्चित होणार आहे.

जर नोंदणीच्या वेळी क्युआर कोड डाउनलोड केला गेला नसला, तरी नागरिक त्यांच्या लॉगिन अकाऊंटवरून तो कधीही डाउनलोड करू शकतात. तसेच आगाऊ तारखेसाठी नोंदणी केल्यास क्युआर कोड डाउनलोड करण्याची सुविधा संबंधित प्रवेशाच्या दिवशी उपलब्ध होईल.



> **“ पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरिककेंद्री आणि तंत्रज्ञानाधारित प्रशासनाच्या दिशेने सातत्याने वाटचाल करत आहे. 'स्वागतम ई-प्रवेश' प्रणालीमुळे नागरिकांना महापालिका मुख्य प्रशासकीय इमारतीत प्रवेशासाठी पूर्वनोंदणीची सुलभ सुविधा उपलब्ध झाली असून वेळेची बचत, पारदर्शकता आणि सुरक्षितता सुनिश्चित होत आहे. नागरिकांकडून या उपक्रमाला मिळत असलेला सकारात्मक प्रतिसाद समाधानकारक असून अधिकाधिक नागरिकांनी या डिजिटल सुविधेचा लाभ घ्यावा.**
> **- डॉ.विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

# पुण्यात 14 दिवसांसाठी जमावबंदी; नेमके काय असणार निर्बंध?

## लोकांच्या जमावावर निर्बंध हा आदेश 26 मे रोजी रात्री 1 वाजल्यापासून 8 जूनच्या मध्यरात्रीपर्यंत लागू असेल

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरात उद्या (मंगळवारी) रात्रीपासून पुढील १४ दिवसांसाठी 'जमावबंदीचे आदेश' लागू करण्यात आले आहेत. या काळात कोणत्याही प्रकारचे मोर्चे, आंदोलने आणि सभा घेण्यास प्रशासनाने पूर्णपणे बंदी घातली आहे.

सार्वजनिक शांतता आणि सार्वजनिक सुरक्षितता राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन-१९५१ च्या कलम ३७ (१) (२) (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश करण्यात आला आहे. सार्वजनिक शांतता आणि कायदा सुव्यवस्था राख्याच्या दृष्टीने सर्वात जास्त वापरले जाणारे हे उपकलम आहे. त्यानुसारच जमावबंदीचे हा आदेश लागू केला आह

या आदेशानुसार नुसार शस्त्रे बाळगणे दगड, स्फोटके, लाठ्या ठेवणे, भडकाऊ घोषणा, गाणी, भाषणे, सार्वजनिक शांतता भंग करणाऱ्या कृती यावर बंदी लागू करता येते. जर एखाद्या व्यक्तीने वरील बंदीचे उल्लंघन करून शस्त्र किंवा धोकादायक वस्तू बाळगल्या तर, पोलीस त्या वस्तू जप्त करू शकतात संबंधित व्यक्तीवर कारवाई होऊ शकते.

जर एखाद्या व्यक्तीने वर नमूद केलेल्या बंद घातलेल्या गोष्टींसंदर्भातील आदेशांचं उल्लंघन करून शस्त्र किंवा धोकादायक वस्तू बाळगल्या तर पोलीस त्या वस्तू जप्त करू शकतात आणि संबंधित व्यक्तीवर कारवाई होऊ शकते असा इशारा देण्यात आला आहे.

यानुसार, सार्वजनिक शांतता आणि सार्वजनिक सुरक्षितता राखण्यासाठी मोर्चे, मिरवणुका, सभा बंद करता येतात. सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी जमावावर निर्बंध घातले जातात हा आदेश 26 मे रोजी रात्री 1 वाजल्यापासून 8 जूनच्या मध्यरात्रीपर्यंत लागू असेल असं सांगण्यात आलं आहे.



### सार्वजनिक शांतता भंग करणाऱ्या कृतीवर बंदी

» या आदेशानुसार नुसार शस्त्रे बाळगणे दगड, स्फोटके, लाठ्या ठेवणे, भडकाऊ घोषणा, गाणी, भाषणे, सार्वजनिक शांतता भंग करणाऱ्या कृती यावर बंदी लागू करता येते. जर एखाद्या व्यक्तीने वरील बंदीचे उल्लंघन करून शस्त्र किंवा धोकादायक वस्तू बाळगल्या तर, पोलीस त्या वस्तू जप्त करू शकतात संबंधित व्यक्तीवर कारवाई होऊ शकते.

### कोणत्या गोष्टी करता येणार नाहीत?

» कोणताही दाहक पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ, ज्वलनशील द्रव पदार्थ बरोबर नेणे.

» दगड अथवा शस्त्रे किंवा अस्त्रे, सोडावयाची अस्त्रे किंवा फेकावयाची हत्यारे अगर साधने बरोबर नेणे, जमा करणे व तयार करणे.

» कोणत्याही इसमाचे चित्राचे, प्रतिकात्मक प्रेताचे, पुढा-यांच्या चित्राचे, प्रतिमेचे प्रदर्शन व दहन करणे.

» शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, दंड, काठ्या, बंदुका व शारीरिक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे.

» शिष्टाचाराच्या विरोधात असणारे चित्रे, चिन्हे, फलक किंवा इतर कोणतीही वस्तू वापरणे किंवा वस्तू तयार करणे, अशा वस्तूंचे प्रदर्शन करणे किंवा प्रसारित करण्यावर बंदी आहे.

» मोठ्याने अर्वाच्य घोषणा देणे, सार्वजनीक टिका करणे, उच्चार गाणी गाणे, वाद्य वाजविणे.

» सार्वजनिक नैतिकता किंवा सुरक्षा धोक्यात येईल किंवा राज्य उलथून टाकण्यास कारणीभूत ठरू शकेल अशा सर्व गोष्टींवर बंदी घालण्यात आली आहे.

### कारवाईचा इशारा

» जर एखाद्या व्यक्तीने वर नमूद केलेल्या बंद घातलेल्या गोष्टींसंदर्भातील आदेशांचं उल्लंघन करून शस्त्र किंवा धोकादायक वस्तू बाळगल्या तर पोलीस त्या वस्तू जप्त करू शकतात आणि संबंधित व्यक्तीवर कारवाई होऊ शकते असा इशारा देण्यात आला आहे.

# पुणे जागेवरून महायुतीत रस्सीखेच; राष्ट्रवादीचा भाजपवर हक्काचा दावा

## 370 जागांच्या संख्याबळाचा दावा करत राष्ट्रवादी काँग्रेसचा भाजपवर जोरदार हक्क; उमेदवारीवर मंगळवारी निर्णय शक्य

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे स्थानिक स्वराज्य संस्थेची जागा राष्ट्रवादी काँग्रेसच्या हक्काची असून, आमच्याकडे सर्वाधिक 370 जागांचे संख्याबळ आहे. त्यामुळे स्वाभाविक आणि न्यायाने ही जागा आमचीच असल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेसकडून करण्यात आला आहे. केवळ राजकीय भूमिका घेण्यासाठी या जागेवर दावा करणे चुकीचे असल्याचे प्रत्युत्तर राष्ट्रवादीकडून भाजपला देण्यात आले आहे

राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष सुनील टिंगरे, महापालिकेतील विरोधी पक्षनेते नीलेश निकम व कार्याध्यक्ष प्रदीप देशमुख यांनी पत्रकार परिषदेत पक्षाची भूमिका मांडली. विधान परिषदेच्या पुणे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जागेवरून महायुतीमधील मित्र पक्ष असलेल्या भाजप व राष्ट्रवादीमध्येच रस्सीखेच सुरू आहे.

मित्रपक्षांच्या आघाड्यासह आमच्याकडे 333 संख्याबळ असल्याचा दावा करीत भाजपने पुण्याच्या जागेची मागणी केली आहे. त्यावर राष्ट्रवादीने प्रत्युत्तर देत भाजपपेक्षा आमच्याकडे अधिक म्हणजेच 370 जागांचे संख्याबळ आहे.

ते पुढे म्हणाले, 'भाजपने मांडलेले गणित चुकलेले आहे. या जागेवरून वाद घालणे चुकीचे आहे. मित्रपक्ष म्हणून राष्ट्रवादीने नेहमीच महायुतीमध्ये समन्वय आणि सहकार्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे आमच्या हक्काच्या जागेबाबत मित्रपक्षांकडूनही त्याच संवेदनशीलतेची आणि सहकार्याची अपेक्षा आहे. आमच्या पक्षात कोणताही वादविवाद नसून, दहापेक्षा अधिक जण इच्छुक आहेत. येत्या मंगळवारी त्यावर मुंबईत निर्णय होईल.




### भाजपच्या दाव्याला राष्ट्रवादीचे प्रत्युत्तर

» पुणे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विधान परिषद जागेवर राष्ट्रवादी काँग्रेसने ठाम दावा करत ही जागा पक्षाचीच असल्याचे स्पष्ट केले आहे. पक्षाकडे सर्वाधिक 370 सदस्यांचे संख्याबळ असल्याने न्याय आणि संख्येच्या आधारावर ही जागा राष्ट्रवादीलाच मिळावी, अशी भूमिका पक्षाने मांडली. शहराध्यक्ष सुनील टिंगरे विरोधी पक्ष नेते निलेश निकम आणि कार्याध्यक्ष प्रदीप देशमुख यांनी पत्रकार परिषदेत पक्षाची भूमिका स्पष्ट केली. भाजपने मांडलेले संख्याबळाचे गणित चुकीचे असल्याचा दावा करत महायुतीत समन्वय आणि सहकार्याची भूमिका कायम असल्याचेही राष्ट्रवादीने नमूद केले.

# घोड धरणातील पाणी आरक्षणामुळे शेती सिंचनावर संकट

## कालवे बंद झाल्याने शिरूर आणि श्रीगोंदा भागातील शेतकऱ्यांची चिंता वाढली

**पुणे | प्रतिनिधी**

चिंचणी (ता. शिरूर) येथील घोड धरणातून डावा व उजवा कालव्याद्वारे उन्हाळी आवर्तन सुरू झाल्यानंतर उपयुक्त पाणीसाठा संपल्याशिवाय आजपर्यंत कधीच आवर्तन बंद केले नव्हते. यंदा मात्र 31 ऑगस्टपर्यंत पिण्याचे पाणी हे उपयुक्त साठ्यातूनच शिल्लक ठेवा, असा दस्तुरखुद्द जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आदेश दिला आहे. त्यानुसार दोन्ही कालवे बंद करण्यात आले आहेत

सध्या घोड धरणामध्ये 0.177 टीएमसी पाणीसाठा शिल्लक असल्याचे घोड शाखा अभियंता वैभव काळे यांनी सांगितले. दरम्यान, अनेक वर्षांपासून एप्रिल महिना उजाडल्यानंतर श्रीगोंदा व शिरूरचे लोकप्रतिनिधी घोडचे उन्हाळी आवर्तन पूर्ण क्षमतेने देण्यासाठी आग्रही राहायचे. घोड धरणातील उपयुक्त पाणीसाठा शिल्लक असेपर्यंत सर्व पाणी उन्हाळी आवर्तनालाच वापरायचा, असा अलिखित नियम होता. मात्र, आता परिस्थिती बदलली आहे.

घोड धरणावरून दोन्ही तालुक्यातील अनेक गावच्या पिण्याच्या पाण्याच्या योजना कार्यान्वित झाल्या. शेकडो कोटी रुपयाची जलजीवन योजनेची कामे मार्गी लागली. या योजनांना मंजुरी देताना घोड धरणातून किती पाणी उचलले जाणार आहे, याचा लेखाजोखा सुरुवातीलाच मांडण्यात आला आहे.

मुळातच घोड धरणाची साठवण क्षमता पाच टीएमसी आहे. यातून रांजणगाव औद्योगिक वसाहत, रांजणगाव, कारेगाव आदी परिसरात पिण्याच्या पाण्याच्या योजना कार्यान्वित आहेत. अहिल्यानगरमधील श्रीगोंदा शहर, काष्टी अशा 15 ते 20 गावांच्या योजना येथूनच कार्यरत आहेत. शिरूर शहरासाठी योजनाही घोड धरणावरूनच प्रस्तावित आहे.



### पिण्याच्या पाण्यासाठी प्रशासनाचा सावध निर्णय

» घोड धरणातील उपलब्ध पाणीसाठा लक्षात घेता प्रशासनाने पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला आहे. ३१ ऑगस्टपर्यंत उपयुक्त साठा राखून ठेवण्याच्या निर्णयामुळे भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यास मदत होणार असल्याचे सांगितले जात आहे. शिरूर, श्रीगोंदा तसेच औद्योगिक परिसरातील अनेक गावांच्या पाणीपुरवठा योजना घोड धरणावर अवलंबून आहेत. त्यामुळे उपलब्ध पाण्याचे नियोजनबद्ध व्यवस्थापन आवश्यक बनले आहे. जलसंपदा विभागाने दीर्घकालीन गरज लक्षात घेऊन घेतलेल्या या निर्णयामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे चित्र दिसत आहे.

### पाणी नियोजनाचा नवा समतोल

» घोड धरणातील पाणीसाठा कमी झाल्यामुळे शेती आणि पिण्याच्या पाण्याच्या गरजांमध्ये समतोल राखण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर उभे राहिले आहे. जलजीवन मिशनअंतर्गत अनेक गावांमध्ये नवीन पाणीपुरवठा योजना सुरू झाल्याने धरणावरील ताण वाढला आहे. त्यामुळे भविष्यात पाणी वापराचे काटेकोर नियोजन करण्याची गरज अधोरेखित होत आहे. पिण्याच्या पाण्यासाठी मोठा साठा राखून ठेवावा लागत असल्याने शेतीसाठी उपलब्ध पाण्यात घट होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. यामुळे शेतकरी आणि प्रशासन यांच्यात समन्वयातून दीर्घकालीन उपाययोजना करण्याची मागणी पुढे येत आहे.

### साकळाई योजनेवरून लाभक्षेत्रात चिंता

» प्रस्तावित साकळाई योजनेसाठी घोड धरणातील सुमारे १.८० टीएमसी पाणी वापरले जाणार असल्याने लाभक्षेत्रातील नागरिक आणि शेतकऱ्यांमध्ये चिंता वाढली आहे. आधीच पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या प्रमाणात साठा राखून ठेवावा लागत असल्याने शेतीसाठी उपलब्ध पाणी कमी होण्याची शक्यता आहे. घोड धरणाच्या लाभक्षेत्रातील अनेक गावांतील शेतकरी यामुळे भविष्यातील पाणी व्यवस्थापनाबाबत साशंक आहेत. त्यामुळे पाणीवाटपाचे संतुलित धोरण आखून शेती आणि पिण्याच्या पाण्याच्या गरजा एकत्रितपणे पूर्ण करण्याची मागणी स्थानिक स्तरावरून जोर धरत आहे.

# वेल्हे-राजगड परिसरात जमीन दलालांचा विळखा; शेतकऱ्यांची मोठी फसवणूक

## बनावट दस्तऐवज, बेकायदा प्लॉटिंग आणि शेतकऱ्यांची फसवणूक वाढल्याने शेकडो भूमिपुत्र भूमिहीन होण्याच्या मार्गावर


**पुणे | प्रतिनिधी**

राजगड, तोरणा, सिंहगड अशा गडकोटांसह पानशेत, वरसगाव, गुंजवणी धरण परिसराला जमीन दलालांनी विळखा घातला आहे. शेतकऱ्यांची फसवणूक करून जमिनीची खरेदी-विक्री, कुलमुखत्यार, दस्त केले जातात. असे गंभीर प्रकार वाढल्याने शेकडो शेतकरी भूमिहीन झाले आहेत. या वाढत्या फसवणुकीच्या प्रकारांमुळे येथील शेकडो शेतकरी आता अल्पभूधारक किंवा भूमिहीन झाले आहेत.

राजगड तालुक्यात बनावट दस्तऐवज तयार करून बेकायदेशीर जमीन विक्री करणाऱ्यांविरोधात वेल्हे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सहाय्यक पोलिस निरीक्षक किशोर शेवते म्हणाले की, जमीन खरेदी-विक्रीमध्ये फसवणूक झाल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. मात्र, यातील बहुतांश प्रकार दिवाणी स्वरूपाचे आहेत. काही प्रकारांत जमिनीच्या चार मालकांपैकी दोन मालक व्यवहार करतात. त्यामुळे प्रत्यक्ष फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात अडचणी निर्माण होतात.

जमीन दलाल अथवा जमीन खरेदी करणाऱ्यांनी फसवणूक केली, त्या शेतकऱ्यांनी सातबारा उतारे, दस्तावेज आदी कागदपत्रांसह तक्रारी दाखल कराव्यात. पोलिस तपासात बेकायदा व्यवहार निष्पन्न झाल्यास तातडीने कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे आवाहन शेवते यांनी केले आहे

तोरणा राजगड, सिंहगडच्या चोहोबाजूंना असलेल्या सह्याद्रीच्या डोंगररांगांतील या जमिनी गेल्या दोन-तीन वर्षांपासून एक ते पाच लाख रुपये प्रतिगुंठा दराने म्हणजे चाळीस लाख ते दोन कोटी रुपये प्रतिएकर भावाने प्लॉटिंग करून विकल्या जात आहेत. सिंहगड किल्ला परिसरात तोरणा आणि राजगडपेक्षा पाच ते दहापट अधिक बाजारभाव मिळत आहे.



### बंगले, रिसॉर्टचे जाळे

» वेल्हे बुद्रुक येथील सह दुय्यम निबंधक कार्यालयात जमीन खरेदी-विक्री दस्तनोंदणीसाठी सुटीचे दिवस वगळता इतर दिवशी जमीन दलालांची मोठी वर्दळ असते. बेकायदा डोंगरटेकड्या फोडून घनदाट जंगल, झाडेझुडपे तोडून सपाटीकरण करून प्लॉटिंग केले आहे. रस्तेही केले आहेत. राजगड तालुक्यातील बहुतांश गावे हरित रेषेत आहेत. या ठिकाणी ठरावीक मर्यादेपर्यंतच घरासाठी बांधकाम करता येते. असे असताना छोट्या प्लॉटिंगमध्ये आलिशान बंगले, फार्म हाऊस तसेच अनेक ठिकाणी रिसॉर्ट, हॉटेलचे मोठे जाळे पसरले आहे.